# ५. नृत्य

## ५.१ विविध हालचाली (हात व पायाच्या लयबद्ध हालचाली)



ताक घुसळणे



घड्याळातील लंबक



सोंड हालवणे



झोका (गती व लय)

- ताक घुसळणे, घड्याळातील लंबक, झोका, हत्तीच्या सोंडेची हालचाल इत्यादी हालचालींचे निरीक्षण करावयास सांगावे.
- हात व पायांच्या लयबद्ध हालचाली करून घ्याव्यात.

## ५.२ चालणे



घोड्याची चाल



सावकाश रमतगमत



सैनिकासारखे



रुबाबात



घाईगडबडीत

## ५.३ नमस्कार



हात जोडून नमस्कार




वाकून नमस्कार



सॅल्यूट

- चालण्याच्या व नमस्काराच्या प्रकारांचे निरीक्षण करावयास सांगावे व त्याप्रमाणे हालचाली करून घ्याव्यात.

## ५.४ उडी मारणे



कांगारू उडी



कांगारूची उडी



पक्ष्यांच्या उड्या



एका पायावर उडी

◆ कांगारूची उडी, पक्ष्यांची उडी, एका पायावर उडी या हालचालींचे निरीक्षण करावयास सांगावे व लयबद्ध हालचाली करून घ्याव्यात.

## ५.५ नृत्य अभिनय

• **बडबड गीतावर नृत्य करणे**

रंगरूपाची पक्ष्यांनी
अदलाबदल केली
याचे कपडे त्याला
मोठी धमाल झाली



बगळ्याचा डगला
कावळ्याने घातला
पांढऱ्याशुभ्र ॲप्रनमध्ये
डॉक्टरच वाटला





मोराचा पिसारा
कोंबड्याने पळवला
वजन कसले झेपते त्याला
सारा मातीत मळवला





चिमणी बिचारी हिरमुसली
तिचे कुणाशी जमेना
करड्या पांढऱ्या रंगाविना
तिला मुळी करमेना



◆ बडबड गीतावर अभिनयासह नृत्य सादरीकरण करून घ्यावे.

X1R8JD